**विषय - सायबर क्राईम सुरक्षेबाबत.**

आपणास याव्दारे कळविणेत येते की, सायबर क्राईम गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

खोटे फोन कॉल -

१. मी बँक अधिकारी बोलत आहे तुमचे कार्ड ब्लॉक होणार आहे.
२. मी बँक अधिकारी बोलत आहे तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी लिंक करायचे आहे.
३. मी बँक अधिकारी बोलत आहे तुमचा एटीएम कार्ड वरील १६ अंकी क्रमांक /वैधता दिनांक / एटीएम कार्ड मागे दिलेला सीव्हीव्ही क्रं. सांगा.
४. एटीएम कार्ड वरील क्रमांक व वैधता दिनांक आणि कार्ड च्या मागे दिलेला सीव्हीव्ही क्रमांक आणि ओटीपी पासवर्ड सांगितल्यावर आपली फसवणूक होवू शकते.
५. बँक खाते आणि एटीएम संबंधित माहिती कोणालाही देवू नका.
६. कोणतीही बँक कोणत्याही ग्राहकाचे बँक खाते आणि एटीएम संबंधित माहिती विचारत नाहीत. ती कोणालाही देवू नका.
७. तुमच्या मोबाईल वर येणारे बॅक मेसेज काळजीपूर्वक वाचा. मोबाईल नं वर येणारे ओटीपी पासवर्ड जो ६ अंकी असतो तो कोणालाही सांगू नका.

एटीएम चा वापर करताना घ्यावयाची काळजी -

१. एटीएम मध्ये पैसे काढताना कुठल्याही अनोळखी व्यक्तीला आत प्रवेश करु देवू नका.
२. एटीएम मधून पैसे काढताना एटीएम कार्डचा पासवर्ड टाकताना कुणालाही न दिसणार नाही याची काळजी घ्यावी.
३. डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड स्वतः स्वाईप मशीन वर स्वाईप करावे. एटीएम कार्ड स्कीमर मशिन मधून स्वाईप होणार नाही याची काळजी घ्या.
४. पासवर्ड टाकताना कुणालाही दिसणार नाही याची काळजी घ्यावी.
५. बँक कार्डचा पासवर्ड गोपनीय ठेवा.
६. पासवर्ड कुणालाही सांगू नका.

सोशल नेटवर्किग साईट वर होणारी फसवणूक -

१. सोशल नेटवर्किंग साईटवर अनोळखी व्यक्तींशी मैत्री करु नये. त्यांचेशी कोणताही व्यक्तीगत माहिती अथवा फोटोची देवाणघेवाण करु नये.
२. सोशल नेटवर्किंग साईटवर माहिती अथवा फोटो शेअर करताना पुर्ण विचार करावा.
३. सोशल नेटवर्किंग साईट व्दारे दिलेल्या कोणत्याही अमिषाला बळू पडू नये.

विवाहविषयक संकेतस्थळावर होणारी फसवणूक -

१. अशा संकेतस्थळावरुन अनोळखी हाय प्रोफाईल परदेशी व्यक्तींकडून मागणी येते.
२. सदरची व्यक्ती स्वतः येत असल्यायचे सांगून किंवा महागडे गिफ्ट पाठवून ते कस्टम मध्ये अडकले असून ते सोडविण्यासाठी वारंवार पैशाची मागणी केली जाते हे पैसे अनोळखी बँक खात्यावर जमा करण्यासा सांगितले जाते.
३. अशा वेबसाईट वर लग्न करण्याचे आमिष दाखवून वेगवेगळया कारणांनी पैशची मागणी केली जाते व अनोळखी खात्यांवर सदरचे पैसे भरण्यास सांगितले जाते.
४. याच कारणाने ओळख वाढवून वैयक्तीक माहिती अथवा फोटोची देवाणघेवाण करुन त्यायोगे ब्लॅकमेल केले जाते व आर्थिक फसवणूक केली जाते.

सोन्याचे दागिने चमकवून देतो त्यावरुन फसवणूक -

घरी येवून केमीकल मध्ये सोने पॉलिश करुन दोत असे सांगून सोने लुबाडतात.

लॉटरीचे आमिष दाखवून फसवणूक -

१. आपले मोबाईल वर लॉटरी लागले असे सांगून खोटे फोन कॉल किंवा मेसेज येवू शकतात. अशा फोन कॉल व मेसेजला बळी न पडता अज्ञात बॅंक खात्यात पैसे जमा करु नका. याव्दारे आपली फसवणूक होवू शकते.

टॉवर लावयाचे सांगून खोटी फसवणूक -

१. आपण मोबाईल टॉवर आपले जागेत लावून लाखो रुपये कमवू शकता, आपली जागा मोबाईल टॉवर लावण्यासाठी निवडली आहे, आपल्या जागेवर मोबाईल टॉवर लावण्यासाठी आगाऊ रक्कम बॅंक खात्यामध्ये जमा करा याप्रकारचे फोन कॉल खोटे असू शकतात.

इन्शुरन्स कंपनीचे खोटे अधिकारी बनून फसवणूक -

१. आपला विमा बंद झाला आहे का, आपल्याला विमा एजंट बदलायचा आहे का, आपल्याला विम्यावर बोनस हवा आहे का, आपल्या विम्याचा हप्ता थकला आहे अशा प्रकारचे फोन कॉल खोटे असू शकतात, खोटया फोन कॉलच्या आधारावर अज्ञात खात्यामध्ये आपले पैसे जमा करु नका.

चेहरा ओळखा बक्षिस जिंका -

१ वर्तमानपत्र किंवा मोबाईल वर येणारे मेसेज सदर आशयाचे बक्षिस योजना येतात, त्यावर संपर्क साधला असता आपण बक्षिस जिंकले आहात असे सांगून बक्षिस मिळविण्यासाठी बॅंक खात्यामध्ये आगाऊ रक्कम जमा करा असे सांगितले जाते अशा प्रकारच्या फसवया जाहिंरातीवर विश्वास ठेवून बॅंक खात्यामध्ये पैसे जमा करु नका.

नोकरी लावून आणि नोकरी देण्याच्या कारणावरुन खोटी फसवणूक -

१. ई-मेलव्दारे आपल्याला कळवले जाते की आपल्याला एका कंपनी नोकरी लागलेली आहे. त्यासोबत जोडून आपल्याला ऑफर लेटर दिले जाते आणि सांगितले जाते की, तात्काळ या बॅंक खात्यात निवड प्रक्रियेसाठी रक्कम भरा.
२. आपण अशा प्रकारच्या ईमेल, फोन कॉल्स ला बळी पडू नये व अज्ञात बॅंक खात्यामध्ये पैसे भरु नये.
३. नोकरी देणारे वेबसाईट वर माहिती अपलोड केलेनंतर त्यांचेकडून येणारे फोन कॉल्स ईमेलचा खरेपणा तपासा. नोकरी मिळवून देणेसाठी पैशाची मागणी केल्यास सावधानता बाळगा.

चिट फंड कंपनी कडून आर्थिक फसवणूक-

चिट फंड कंपनीत पैशाची गुंतवूणक करताना सावधानता बाळगा.

लोनच्या नावाखाली फसवणूक -

१. फसवणारे इसम कमी व्याज दरात अधिक कर्ज देतो असे सांगून कुठल्याही कागदपत्राशिवाय तारणाशिवाय ताबडतोब लोन मिळवून देतो अशी जाहिरात दिली जाते.
२. लोन पास करणे साठी प्रक्रिया रक्कम बॅंक खात्यामध्ये जमा करा असे सांगितले जाते.
३. ती रक्कम घेवून फसवणारे इसम फरार होतात. अशा प्रकारे आपली फसवणूक होते.

ओएलएक्स व्दारे होणारी फसवणूक -

१. आर्मी मध्ये सर्व्हिसला असून आपली वस्तू कुरियने पाठवून देतो म्हणून बॅंक खात्यामध्ये पैसे भरावयास सांगतात. यापासून सावधानता बाळगा.

**टिप** – कृपया सदरची माहिती आपले मोबाईल मध्ये असलेल्या सर्व व्हॉटसअॅप ग्रुपमध्ये पाठवावी.